**<u>ठळक बातम्या</u>**

- गोदावरी खोऱ्यातली पाण्याची तूट दूर करून मराठवाड्यातल्या प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचवण्याचं मुख्यमंत्र्यांचं मराठवाडा मुक्तिदिनाच्या कार्यक्रमात आश्वासन.

- बीड ते अहिल्यानगर रेल्वेसेवेचं तसंच अंमळनेर ते बीड रेल्वेमार्गाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान आणि ८व्या राष्ट्रीय पोषण मासाचा प्रारंभ

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

**आणि**

- कुख्यात गुन्हेगार छोटा राजनचा जामीन रद्द

**<><><><><>**

मराठवाडा मुक्तिदिन आज साजरा होत आहे. प्रचंड जन आंदोलन आणि भारत सरकारच्या पोलीस कारवाईनंतर १९४८ मधे याच दिवशी निजामाच्या राजवटीतून मुक्त होऊन हा प्रदेश भारतीय संघराज्यात विलीन झाला. छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण झालं. गोदावरी खोऱ्यातली पाण्याची तूट दूर करून मराठवाड्यातल्या प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचवण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. राज्याच्या विविध नद्यांमधलं वाहून जाणारं पाणी गोदावरी खोऱ्यात वळवलं जाणार असून, या कामाला पुढच्या सहा महिन्यात प्रत्यक्ष प्रारंभ होणार असल्याचं ते म्हणाले –

**बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

मराठवाड्यात उद्योग, पाणी पुरवठा, रस्ते बांधणी आदी क्षेत्रात होणाऱ्या विकासकामांचा मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला. त्यापूर्वी त्यांनी मुक्तीसंग्रामाचं प्रतीक असलेल्या हुतात्मा स्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केलं. पालकमंत्री संजय शिरसाट, खासदार संदिपान भुमरे, खासदार कल्याण काळे, राज्य वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी, यांच्यासह जिल्ह्यातले सर्व लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

बीड इथं पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. या स्वातंत्र्यलढ्यात प्राण अर्पण करणाऱ्या शूरवीरांचं योगदान अमूल्य असून, त्यांचं स्मरण हेच आपल्या देशभक्तीचं बळ आहे, असं त्यांनी नमूद केलं.

परभणी इथं पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आलं. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची जाणीव ठेवून त्यांच्या प्रेरणेने जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण वाटचाल करुया असं त्या म्हणाल्या.

जालना इथं पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते, हिंगोली इथं पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते, लातूर इथं पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे यांच्या हस्ते, धाराशिव इथं पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते, तर नांदेड इथं पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. मराठवाड्यतल्या सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयांमधे तसंच शाळा महाविद्यालयांमधे मुक्तिदिनानिमित्त ध्वजवंदनेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पाच्या अंमळनेर ते बीड या टप्प्याचं उद्घाटन आणि बीड ते अहिल्यानगर रेल्वेसेवेचा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांच्या हस्ते आज झाला. या मार्गाच्या विद्युतीकरणाचं काम पुढच्या ३ ते ४ महिन्यांत पूर्ण होईल, असं आश्वासन फडणवीस यांनी यावेळी बोलताना दिलं. ही गाडी रेल्वेच्या इंजिनावर धावेल तेव्हा वेग वाढेल आणि प्रवासाचे तासही कमी होतील, असं फडणवीस म्हणाले. उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार बजरंग सोनावणे, रजनी पाटील, आमदार पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, रेल्वेचे अधिकारी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

सेवा आणि सुशासन या तत्वांचं अनुसरण करीत केंद्र सरकारने गेल्या ११ वर्षांत देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख उंचावला आहे. या प्रगतीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा सिंहाचा वाटा आहे. मोदी यांचा जागतिक पातळीवरचं प्रभावशाली व्यक्तिमत्व बनण्याचा प्रवास असाधारण आहे. विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांच्या नेतृत्वाविषयी गौरवोद्गार काढले आहेत.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी प्रधानमंत्री मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान केलं. याच निमित्ताने नवी दिल्ली इथे एका कार्यक्रमात सेवा पर्वावर दूरदर्शनसाठी कार्यक्रमांची एक विशेष मालिका सुरू केल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. प्रधानमंत्री मोदी यांच्याविषयी गौरवोद्गार काढताना ते म्हणाले….

**होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव**

ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले प्रधानमंत्री मोदी यांच्याविषयी म्हणाल्या…

**होल्ड... बाईट - आशा भोसले**

ज्येष्ठ लेखिका सुधा मूर्ती म्हणाल्या...

**होल्ड बाईट - सुधा मूर्ती**

**<><><><><>**

नव्या जीएसटी सुधारणांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत सुमारे २ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होईल, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज विशाखापट्टणम इथं जीएसटी सुधारणांबाबत आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या सुधारणांमुळे कर भरण्यात खर्च होणाऱ्या सामान्य लोकांच्या पैशांची बचत होईल, असंही त्या म्हणाल्या. नव्या सुधारणांमुळे २०२५ या वर्षात जीएसटी संकलनात वाढ होऊन ते  २२ लाख कोटी रुपयांहून अधिक असेल, असं त्यांनी सांगितलं. या सुधारणांमुळे कृषी संबंधी वस्तूंवरचा कर कमी झाल्यानं शेतीच्या आधुनिकीकरणाला चालना मिळेल आणि शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सुधारणांचा लाभ सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांबरोबरचं रोजगारनिर्मिती करणाऱ्या क्षेत्रांना होईल, असंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

नारीशक्ती हा देशाच्या प्रगतीचा मुख्य आधार असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. मध्य प्रदेशच्या धार जिल्ह्यात आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान आणि ८व्या राष्ट्रीय पोषण मासाचा प्रारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. हे दोन्ही उपक्रम आजपासून दोन ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहेत. याअंतर्गत सर्व महिलांनी मोफत वैद्यकीय तपासणीची सुविधा आणि  औषधं मिळणार आहेत. मध्य प्रदेशात आदि सेवा पर्व आणि देशातल्या पहिल्या पीएम मित्र पार्कची पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाली. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ या विशेष राष्ट्रीय अभियानाला आज इंदूर इथं प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते सुरूवात झाली. मुंबईच्या यशवंतराव चव्हाण केंद्रातून केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीडमधून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या कार्यक्रमात दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

दोन ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या अभियानात सर्व महिला आणि बालकांनी सहभागी होण्याचं आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम देशभरात होत आहेत

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मोदी यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मोदी यांनी असाधारण नेतृत्व आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर महान ध्येय साध्य करण्याची संस्कृती देशात रुजवली आहे, असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य, राज्याराज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय आणि इतर अनेक क्षेत्रातल्या मान्यवरांनी मोदी यांचं अभिष्टचिंतन केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्र्यांना शुभेच्छा देत एक विशेष लेख आज प्रसिद्ध केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनीही प्रधानमंत्र्यांचं अभिष्टचिंतन केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाचं औचित्य साधून भाजपातर्फे सेवा पर्व राबवण्यात येत आहे. यात ठिकठिकाणी सेवा, रक्तदान शिबिरं, स्वच्छता मोहिमा, व्याख्यानं, प्रदर्शनं इत्यादींचं आयोजन करण्यात आलं आहे.

माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे प्रधानमंत्र्यांच्या शालेय जीवनावर आधारित चलो जीते हैं या चित्रपटाचं पुनर्प्रदर्शन आज लहान मुलांसाठी करण्यात येणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा पंधरवड्यामध्ये केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघात विविध उपक्रमांचं आयोजन केलं आहे. त्यांची सुरुवातही आजपासून झाली.

आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधांचा विकास यासारख्या विषयांवरचे ते उपक्रम आहेत. देशव्यापी स्वच्छता ही सेवा अभियानालाही आजपासून सुरुवात झाली आहे.

<><><><><>

कुख्यात गुन्हेगार छोटा राजनला एका हत्या प्रकरणात मिळालेला जामीन आज सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप महेता यांच्या न्यायालयाने हा निर्णय दिला. मुंबईतला हॉटेल व्यावसायिक जया शेट्टी याच्या हत्येप्रकरणी छोटा राजनला खालच्या न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली होती. ती स्थगित करुन मुंबई उच्च न्यायालयाने त्याला जामीन दिला होता. मात्र ४ वेगवेगळ्या खटल्यांमधे दोषी ठरलेला छोटाराजन गेली २७ वर्ष फरार राहिल्याचं सांगत सर्वोच्च न्यायालयाने त्याचा जामीन रद्द केला.

<><><><><>

जम्मू-काश्मीरमध्ये खराब हवामान आणि वारंवार होणाऱ्या भूस्खलनामुळे गेले २२ दिवस बंद असलेली वैष्णोदेवी यात्रा आजपासून पुन्हा सुरू झाली. यासाठी कटरा इथं मोठ्या प्रमाणात भाविक जमले आहेत. भाविकांच्या सुरक्षेसाठी प्रशासनानं सर्व व्यवस्था केल्या आहेत.

<><><><><>

टोक्यो इथं झालेल्या जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत उंच उडी प्रकारात भारताच्या सर्वेश कुशारे यानं सर्वोत्तम वैयक्तिक कामगिरी करून सहावं स्थान मिळवलं. शेवटच्या प्रयत्नात त्यानं २ पूर्णांक २८ शतांश मीटर उंच उडी मारली.

<><><><><>

जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा ऑलिम्पिक सुवर्णपदकविजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा आज मैदानात उतरणार आहे.

जपानची राजधानी टोक्यो इथं होणाऱ्या या स्पर्धेच्या अ गटात नीरजचा सामना डायमंड लीगचा विजेता ज्युलियन वेबर, केशॉर्न वॉलकॉट, जेकब वादलेच आणि भारताचाच सचिन यादव यांच्याशी होईल. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी ३ वाजून ४० मिनिटांनी स्पर्धेला सुरुवात होईल. महिला गटात भारताचं प्रतिनिधित्व अन्नू राणी हिच्याकडे आहे. या स्पर्धेची पात्रता फेरी उद्या, तर अंतिम फेरी शनिवारी होणार आहे.

//<><><><><>//